IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** नालासोपारा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0376 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/11/2019 00:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 01/11/2019
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 01/11/2019
   **Time From (वेळेपासून):** 13:01 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:01 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/11/2019 **Time (वेळ):** 00:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/11/2019 00:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.1 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** नालासोपारा पोलीस ठाणेच्या ,आवारातील चहा टपरीजवळ , नालासोपारा पश्चिम ता वसई ,जिपालघर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संदिप सुरेश सिंग 7507864036

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

फिर्याद दिनांक : ०१/११/२०१९

मी श्री. संदिप सुरेश सिंग, वय ३८ वर्षे, धंदा. व्यायामशाळा (जिम) व्यवसाय, रा. सी/१०, तिसरा मजला, पांचाळनगर, के.टी. व्हीजन समोर, वसई प. मो. ७५०७८६४०३६ समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी वरील प्रमाणे असून नालासोपारा व विरार येथे इन्टेन्स फिटनेस सेंटर नावाची जिम चालवून माझा उदरनिर्वाह चालवितो. माझे वरील जिममध्ये काम करणा—या लोकांची मी नालासोपारा प., धनंजय नाका, येथील डी/५०, रॉयल आर्केड या बंगल्यामध्ये राहण्याची सोय केलेली आहे. माझेकडे काम करणारा ईसम नामे आण्णा हा सदरच्या बंगल्यामध्ये एका होमो (गे) व्यक्तीला घेवून आला होता म्हणून मी व माझे जिममध्ये काम करणारा ईसम सुरेंद्र गौड यांनी आण्णा व त्यांनी आणलेला होमो (गे) व्यक्ती ब्रिजभुषण सिंह यांना तेथून हुसकावून लावले.

त्यानंतर होमो (गे) व्यक्ती ब्रिजभुषण सिंह यांनी दिलेल्या तक्रारीवरून माझे व माझेकडे काम करणारा सुरेंद्र गौड याचेविरूध्द नालासोपारा पोलीस ठाणे येथे I ३५१/१९ भादविस कलम ३९४, ३८४, ३४ व माहीती तंत्रज्ञान अधिनियम ६६ (१) प्रमाणे गुन्हा दाखल केलेला आहे. सदर गुन्हयामध्ये मला व सुरेंद्र गौड यांना नालासोपारा पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावने यांनी दिनांक १२/१०/२०१९ रोजी अटक केलेली होती. त्यावेळी सदर गुन्हयाचे तपासात मदत करून मला लवकर जामीन मिळवून देण्यासाठी पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांनी माझेकडे लाचेची मागणी केली त्याप्रमाणे माझे मावशीने तिचे सोन्याचे दागीने गहाण ठेवून पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांना १,००,०००/— रूपये (एक लाख रूपये) दिले. त्यानंतर माझी चार दिवसानंतर सदर गुन्हयामधून जामीनावर सुटका झाली.

त्यानंतर पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांनी मला फोन करून नालासोपारा पोलीस ठाण्यात बोलावून घेवून माझेविरूध्द चॅप्टर केस न करण्यासाठी तसेच माझेकडे काम करणारा सुरेंद्र गौड यांना लवकर जामीन मिळवून देण्यासाठी १,४०,०००/— रूपये लाचेची मागणी केली. परंतू मला पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे लाचेची रक्कम दयावयाची ईच्छा नसल्याने, मी दिनांक २९/१०/२०१९ रोजीच्या अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कॅम्प पालघर कार्यालयाच्या वसई रेल्वे स्टेशन येथील जनजागृती कार्यक्रमा दरम्यान लाचेच्या मागणीची लेखी तक्रार लिहून दिलेली आहे.

त्याअनुषंगाने अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे कॅम्प पालघर कार्यालयाचे चे पोलीस निरीक्षक श्री. साळुंखे यांनी दिनांक ३१/१०/२०१९ रोजी दोन पंच साक्षीदारांसमक्ष पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत खात्री करण्यासाठी माझे अंगावर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. ०१ यांचेसह पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठी पाठविले. त्यावेळी पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांनी त्यांचे उजव्या हाताच्या अंगठयावर अंगठयाच्या बाजुचे बोट चोळून पैसे आणलेत का? याबाबत ईशा—याने विचारणा केली त्यावेळी मी त्यांना "सर अभी पैसा नही लाया" असे सांगून मी त्यांना "साहाब चेक है बॅक से लेके आता हूं" असे बोललो. माझेकडील अॅक्सीस बॅकेच्या चेकवर पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांचेसमक्ष ५०,०००/— रूपये रक्कम लिहीली. ती लोकसेवक सोनावणे यांनी पाहून मला "कॅश लेके आना" असे सांगीतले. त्यानंतर मी पंचासमक्ष पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे फोनवरून बॅकेत पैसे नसल्याने मित्राकडून तुम्ही सांगीतल्याप्रमाणे जोडणी केलेली आहे असे सांगीतले असता, त्यांनी मला दिनांक ०१/११/२०१९ रोजी सकाळी १०.०० वा. नालासोपारा पोलीस ठाणे येथे येण्यास सांगीतले. तसा सविस्तर पंचनामा अॅन्टी करप्शन ब्युरोच्या अधिका—यांकडून करण्यात आलेला आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. साळुंखे यांनी दिनांक ०१/११/२०१९ रोजी दोन पंच साक्षीदारांसमक्ष मी हजर केलेल्या ५०,०००/— रूपये रक्कमेच्या नोटांवर सापळा पुर्व पंचनाम्याची कार्यवाही पुर्ण करून सदरच्या

Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सी/10,तिसरा मजला, पांचाळनगर,केटीव्हिजन समोर, , वसई प,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | सी/10,तिसरा मजला, पांचाळनगर,केटीव्हिजन समोर, , वसई प,नालासोपारा,पालघर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7507864036

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनिरी धर्मेंद्र अशोक सोनवणे | | | 1. B/105,पाटणकर रेसिडेन्सी, साईनगर, नालासोपारा प ता वसई ,नालासोपारा, पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी दराच्या 2000 रु. च्या 25 नोटा. | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 50,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील आरोपीत नाम लोकसेवक श्री धर्मेंद्र अशोक सोनवणे वय-41 वर्षे नेमणुक- नालासोपारा पोलीस ठाणे जिल्हा पालघर राहणार- B/105, पाटणकर रेसिडेन्सी, साईनगर नालासोपारा प. ता. वसई जि. पालघर यांनी त्यांना मिळेलेल्या पदाचा दुरुपयोग करुन फिर्यादी विरुद्ध चप्टर केस न करण्यासाठी तसेच फिर्यादीकडे काम करणारा सुरेंद्र गौडा यांना लवकर जामीन देण्याकरिता मदत करण्यासाठी फिर्यादीकडे 1,40,000 रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 50,000/- रु.स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम दि.01/11/2019 रोजी 13.01 वा.च्या सुमारास त्यांचे टेबलच्या उजव्या बाजुच्या खणामध्ये ठेवण्यास सांगुन लाचेच्या रक्कमेचा स्विकार करुन स्वताचा आर्थिक फायदा करुन घेतला म्हणुन त्याच्याविरुघ्द गुन्हा.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** VASANT CHANDRAKANT LABDE(I (Inspector)) / PBMAH69388 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned by CamScanner

लाचेच्या रक्कमेसह पंच नं. ०१ यांचेसोबत पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांचेकडे पाठविले असता पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांनी मागणी केलेली ५०,०००/– रूपये लाचेची रक्कम ते बसत असलेल्या टेबल्याच्या उजव्या बाजुच्या खणामध्ये ठेवण्यास सांगीतल्याप्रमाणे मी सदरची लाचेची रक्कम त्यांच्या टेबल्याच्या उजव्या बाजुच्या खणामध्ये ठेवली त्यावेळी ते तेथून निघून त्यांचे कार्यालयाचे समोरील बाजूस असलेल्या मोकळया जागेत निघून गेले. व मला सदरच्या रूममध्ये थांबून राहण्यास सांगीतले. त्यावेळी मी सदर रूममध्ये थांबून राहील्याने पंच नं. ०१ यांनी अॅन्टी करप्शन ब्युरोच्या अधिका–यांनी सांगीतलेला पुर्वनियोजीत ईशारा केला असता, पोलीस उप निरीक्षक श्री. सोनावणे यांना अॅन्टी करप्शन ब्युरोच्या अधिका–यांनी ताब्यात घेतलेले आहे. तसा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक श्री. धर्मेंद्र अशोक सोनावणे वय ४१ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, जि. पालघर यांनी त्यांना मिळालेल्या पदाचा दुरूपयोग करून माझेविरूध्द चॅप्टर केस न करण्यासाठी. तसेच माझेकडे काम करणारा सुरेंद्र गौड यांना लवकर जामीन मिळवून देण्याकरीता मदत करण्यासाठी माझेकडे १,४०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५०,०००/– रूपये स्विकारण्याचे मान्य करून सदरची लाचेची रक्कम दिनांक ०१/११/२०१९ रोजी १३.०१ वा. च्या सुमारास त्यांचे टेबलच्या उजव्या बाजुच्या खणामध्ये ठेवण्यास सांगून लाचेच्या रक्कमेचा स्विकार करून स्वत:चा आर्थीक फायदा करून घेतला. म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत करण्यात आली असून, त्यानंतर ती मला वाचून व हिंदीतून समजावून सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(भारत साळुंखे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे
कॅम्प पालघर.

ही फिर्याद लिहून दिली.

(संदिप सुरेश सिंग)

Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VASANT CHANDRAKANT LABD
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMAH69388

ठाणे अमलदार
नालासोपारा पोलीस ठाणे



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned by CamScanner